


# घरभेद्या

शाम फडके

म. ग्रं. सं. ठाणे
विषय ना०वा
वा. क्र. १६८०३

IRBK-0116873

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठ

96603
वि. वा

# घर भेद्या

[ फक्त मुलांसाठी एक एकांकिका ]

IRBK-0116873
IRBK-0116873

प्रकाशक :
मो. द. नांदुरकर,
अनमोल प्रकाशन
६८३ बुधवार पेठ,
पुणे ४११००२.

© श्याम फडके

सूचना : ही एकांकिका करण्यासाठी मानधन रुपये दहा सौ. सुमती श्याम फडके, इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे २, या पत्त्यावर पाठवणे आवश्यक आहे.

नोव्हेंबर १९७६

प्रमुख विक्रेते : रसिक साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११००३०

किंमत : एक रुपया फक्त

मुद्रक :
म. बा. जोशी,
ज्ञानविलास प्रेस,
२७ बुधवार पेठ,
पुणे ४११००२.

वा० वा
५/३/७७
वाचनालय

# ' घरभेद्या '

## ( फक्त मुलांसाठी प्रयोगक्षम एकांकिका )

**पात्र परिचय**

१. सूर्याजीराव (कोंदणगडचा किल्लेदार)

२. भागोजीराव (सूर्याजीरावांच्या हाताखालचा हवालदार)

३. हिरोजी (एक हेर)

४. भागोजीरावांचा एक शिपाई
आणि एक दोन शिपाई

**दृष्ये चार**

(ही सर्व एकांकिका एका सेटवर करता येईल. पण शक्य असेल तिथे पुढील चार सेट (पडद्याने) दाखवावे. दोन दृष्यात अंतर दाखविण्यासाठी संगीताचा वापर करावा.)

दृष्य पहिले : बुरुजावर

दृष्य दुसरे : महालात

दृष्य तिसरे : एका रस्त्यावर

दृष्य चवथे : दरबारात

श्याम फडके यांची केवळ मुलांसाठी नाटके :

(१) एक होतं भांडणपूर

(२) राजकन्या नीलमपरी

(३) सिंदबादची आठवी सफर

एकांकिका

(१) फजिती रे फजिती

(२) कक्का, किक्का कुक्का

(३) राजकलश

(४) हिमगोरी आणि सात बुटके

## प्रवेश १ ला

(स्थळ: एका किल्ल्याचा बुरुज. यावर भागोजीराव येरझारा घालीत आहे. त्याच्या हालचालींवरून तो कोणाची तरी वाट पाहतोय असं दिसतं. भयंकर अस्वस्थ झालाय. इतक्यात एका बाजूने एक शिपाई धाईधाईनं येतो. त्याला मुजरा करतो,)

भागोजीराव : काय झालं ?

शिपाई : काम फत्ते.

भागोजीराव : (आनंदाने) काय सांगतोस ! मी सांगितल्या-प्रमाणे खबरीची पिशवी पोचवलीस ?

शिपाई : होय सरकार

भागोजीराव : मी सांगितलं त्याच माणसाच्या हातात दिलीस ना !

शिपाई : होय सरकार

भागोजीराव : वाटेत कोणी....

शिपाई : वाटेत मी कोणालाही भेटलो नाही. कोणाकडेही पाहिलं नाही. आपण सांगितल्याप्रमाणे थेट विजापूरला गेलो आणि त्या दरबारी सरदारास त्याच्या घरी भेटलो. आपण दिलेली मोहोर त्याला दाखवली. ताबडतोब त्यांनी मला आत बोलावून घेतलं. मी त्यांना आपण दिलेली पिशवी दिली.

भागोजीराव : (एक मोहोर देत) शाबास ! ही घे बक्षिसी. आपलं सगळं काम फत्ते झालं तर तुला मी आणखी मोबदला देईन. पण नीट हुशारीनं रहा.

शिपाई : होय सरकार. (दूरवर पहात) सरकार, किल्लेदार-साहेब इकडेच येताना दिसताहेत. ते पहा....(दाखवतो)

भागोजीराव : तू जा आपल्या कामाला. (शिपाई जातो. भागोजीराव आनंदानं येरझारा घालतो. सूर्याजीराव येतात. भागोजीराव त्यांना मुजरा करतो)

सूर्याजीराव : काय भागोजी, कसलं निरीक्षण चाललंय !

भागोजीराव : बुरुजावरून सगळा किल्ल्याचा परिसर पहाता येतो सरकार. इथून सगळी माणसं दिसतात.

सूर्याजीराव : खरंच. या किल्ल्यासारखं वैभव नाही दुसरं.... नाही भागोजी–तुला तसं वाटतं की नाही ?

भागोजीराव : अलबत वाटतं किल्लेदारसाहेब. आजुबाजूच्या वीस पंचवीस कोसाच्या परिसरात कोंदणगडासारखा भक्कम आणि सुरक्षित असा दुसरा किल्ला नाही.

सूर्याजीराव : कोणी हा किल्ला बांधला असेल त्याची धन्य आहे. त्याचा तलास मिळणे कठीण....पण भागोजी तुला शक्य झालं तर याचा तलास जरूर कर.

भागोजीराव : आज्ञा किल्लेदारसाहेब.

सूर्याजीराव : आणि हे बघ माझ्या मनात काही गोष्टी आल्या आहेत त्याही तुझ्या कानी घालायच्या आहेत.

भागोजीराव : सांगा किल्लेदारसाहेब.

सूर्याजीराव : हा सोन्यासारखा किल्ला शत्रूच्या ताब्यात जाऊन याची धूळदाण व्हावी असं मला वाटत नाही. त्यामुळेच हा किल्ला

विजापूरच्या बादशहाला द्यावा का छत्रपती शिवाजीमहाराजांच्या ताब्यात द्यावा याचा निर्णय मी माझ्या मनाशी घेतला आहे. शिवाजीमहाराजांनी आज जे स्वराज्याचं महान कार्य चालवलं आहे त्यातच आपण सामील होऊन आपणही चांगल्या कामाला हातभार लावावा असं मला वाटतंय. तुला काय वाटतं ?

भागोजीराव : आपली कल्पना चांगलीच आहे किल्लेदार-साहेब.

सूर्याजीराव : मी अजून तुझ्याशिवाय कोणाजवळ बोललो नाही. आठ दिवसांपूर्वी तुला फक्त कल्पना दिली होती. पण आज मी....

भागोजीराव : बोलूच नका महाराज....... भिंतीलाही कान असतात. चुकून विजापूरच्या दरबारात ही बातमी समजली तर ?

सूर्याजीराव : त्यांना मुळीच समजणार नाही.

भागोजीराव : असं म्हणू नका सरकार. त्यांचेही हेर हुषार आहेत.

सूर्याजीराव : असू देत. पण तुझं काय मत आहे भागोजी ?

भागोजीराव : कशाबद्दल ?

सूर्याजीराव : माझ्या या निर्णयाबद्दल ?

भागोजीराव : आपण घेतलेला निर्णय योग्यच असणार सरकार.

सूर्याजीराव : (हसत) लबाड आहेस तू

भागोजीराव : मी लबाड !

सूर्याजीराव : नाहीतर ! माझ्या प्रश्नाचं उत्तर तू धूर्तपणानं टाळलंस हे समजलं मला.

भागोजीराव : तसं नाही किल्लेदारसाहेब. मी लबाडी मुळीच केली नाही. मी स्पष्टच सांगतो की आपण शिवाजीमहाराजांनाच सामील व्हावं....त्याच्यासारखं चांगलं आणि पवित्र काम नाही.

सूर्याजीराव : ठीक आता माझं समाधान झालं. चला.

(दुसऱ्या बाजूने जातात.)

**प्रवेश २ रा**

(स्थळ : एक महाल. एका बाजूने सूर्याजीराव येतात. दूरवर दिसणाऱ्या सूर्याला नमस्कार करतात. आणि सूर्याची मनोमन पूजा करतात. तोच त्यांच्या पाठीमागून एक साधू येतो.)

साधू : आलख निरंजन....

सूर्याजीराव : वा ! स्वामी महाराज, आपण ! कसे अगदी वेळेवर आलात. आताच मी त्या सूर्यनारायण देवाला नमस्कार करीत होतो. पण सूर्यनारायण त्या काळ्या ढगांच्या आड गेल्यामुळे परमेश्वराला नमस्कार केल्याचं समाधान मिळत नव्हतं. त्यामुळे आपण अगदी योग्य वेळी आलात स्वामीमहाराज. आता आपल्या पायांना वंदन करून आशीर्वाद मागतो. (पुढे होतात तो साधू मागे होतो)

साधू : थांबा किल्लेदारसाहेब.

सूर्याजीराव : काय झालं महाराज ? मला नमस्कार करू द्या.

साधू : नाही किल्लेदारसाहेब.

सूर्याजीराव : काय झालं ? माझ्या हातून काही चुकीच्या गोष्टी घडल्या का—सांगा ना साधूमहाराज.

साधू : किल्लेदारसाहेब आपण मला ओळखलं नाहीत ?

सूर्याजीराव : (नीट पहात....) तू....हिरोजी ?

(हिरोजी सूर्याजीरावांच्या पाया पडतो)

साधू : हो सरकार. मी हिरोजी

सूर्याजीराव : मी तुला खरोखरंच ओळखलं नाही हिरोजी.

साधू : आपण मला नमस्कारच करण्याची वेळ आणली होती म्हणून नाहीतर चटकन तुम्हाला माझी ओळख देणार नव्हतो.

सूर्याजीराव : बरं काही बातमी ?

हिरोजी : त्यासाठीच मी तातडीनं आलोय सरकार.

सूर्याजीराव : काय सांगतोस ?

हिरोजी : हो ना....पण थांबा.... (आजुबाजूचा कानोसा घेतो)

सूर्याजीराव : काही काळजी करू नकोस. आजुबाजूला कोणी नाही. बोल.

हिरोजी (अजून कावराबावराच) : सरकार बातमी फार गंभीर आहे.

सूर्याजीराव : असं ! सांग तरी.

हिरोजी : आपला हा कोंदणगड किल्ला शिवाजी महाराजांच्या ताब्यात देऊन टाकायचा असं तुम्ही ठरवलत ना ?

सूर्याजीराव : (आश्चर्याने) तुला कसं कळलं ?

हिरोजी : सरकार ही बातमी फक्त मलाच कळली असती तरी मला काळजी वाटली नसती.

सूर्याजीराव : (घाबरून) म्हणजे आणखी कोणाला कळली ?

हिरोजी : ही बातमी थेट विजापूरापर्यंत जाऊन पोचली आहे.

सूर्याजीराव : काय ?

हिरोजी : होय सरकार.

सूर्याजीराव : ही बातमी बादशहापर्यंत पोचली !

हिरोजी : ही बातमी विजापूरच्या दरबारातल्या प्रत्येकाच्या कानावर गेली.

सूर्याजीराव : शक्य नाही.

हिरोजी : माझ्यावर विश्वास ठेवा सरकार. ही बातमी मला कळायचं काही कारण नव्हतं. विजापूरला हेरगिरी करताना मला समजलं, तसा मी आपल्याला सांगण्यासाठी धावत सुटलो.

सूर्याजीराव : (घाबरून) काय सांगतोस !

हिरोजी : विश्वास ठेवा सरकार.

सूर्याजीराव : बरं आणखी काही ?

हिरोजी : तुमची ही बातमी विजापूरात गेल्यावर बादशहा खवळला. त्याने ताबडतोब किल्ला ताब्यात घेण्यासाठी खान-साहेबाची नेमणूक केली. तो सैन्य घेऊन एकदोन दिवसांत कोंदण-गडावर येईल. लढाई करून किल्ला तर मिळवीलच शिवाय....

सूर्याजीराव : शिवाय काय ?

हिरोजी : आपल्यालाही कैद करून नेईल.

सूर्याजीराव : नाही, शक्य नाही. असं होणार नाही. हा किल्ला मी कोणाच्या ताब्यात द्यायचा हे मीच ठरवू शकतो.

हिरोजी : पण सरकार बादशहाच्यापुढे आपला कसा टिकाव लागणार ?

सूर्याजीराव : मला मरणाची भीती नाही हिरोजी. मी त्याच्या सैन्याशी लढेन. लढतालढता मरण येण्यासारखं भाग्य नाही.

हिरोजी : पण सरकार त्याच्या हजारो सैन्यापुढे आपले सैन्य काय टिकाव धरणार !

सूर्याजीराव : अरेरे ही बातमी शिवाजी महाराजांच्या कानी घालायला हवी.

हिरोजी : तेवढा अवसर कुठे आहे सरकार !

सूर्याजीराव : म्हणजे ?

हिरोजी : शिवाजी महाराज दक्षिणेच्या स्वारीत अडकले आहेत, त्यामुळे त्यांना या किल्ल्याकडे लक्ष द्यायला वेळ कुठे आहे ? आणि बादशहा तर किल्ला घ्यायला एवढा अधीर झाला आहे की कदाचित त्याचं सैन्य तयारीला लागलं असेल.

सूर्याजीराव : हा अन्याय आहे हिरोजी.

हिरोजी : होय सरकार. पण सत्तेपुढे शहाणपण नाही. सत्ता अन्याय करू लागली तर त्यासारखं दुर्दैव नाही.

सूर्याजीराव : म्हणूनच शिवाजी महाराजांना हा किल्ला द्यायचा असं ठरवलं होतं मी.

हिरोजी : आपला निर्णय योग्य होता सरकार....

सूर्याजीराव : पण मी आता काय करू ?

हिरोजी : आपण सबुरीनं घ्यावं.

सूर्याजीराव : सबुरीनं काय घेऊ ? उलट जल्दी करायला हवी. बादशहाचा सरदार आला तर....छे आता काय करावं हे सुचत नाही....

हिरोजी : मी सांगू सरकार ?

सूर्याजीराव : सांग ना.

हिरोजी : घरभेद्या शोधून काढा.

सूर्याजीराव : घरभेद्या ?

हिरोजी : होय घरभेद्या. जोपर्यंत तो या किल्ल्यावर वावरतो आहे तोपर्यंत आपल्याला क्षणाक्षणाला धोका आहे सरकार. म्हणून आधी त्याचा शोध घ्यायला हवा. कारण आता एक गोष्ट नक्की होणार म्हणजे हा गड तुमच्या हातून जाणार.

सूर्याजीराव : अरेरे ! यापेक्षा दुसरी कोणतीही वाईट बातमी या जगात असू शकणार नाही. मी या गडावर मुलासारखं प्रेम केलंय हिरोजी. या किल्ल्यावरच्या मातीच्या प्रत्येक कणाला माझ्या हातापायाचा स्पर्श झालाय. किल्ल्याच्या बुरुजावर उभं राहून पूर्वेला सूर्यनारायणाच्या रथाचं आगमन पहाणं हा तर माझा छंद पावसाच्या सरी मी अनेकवेळा माझ्या अंगावर घेतल्या आहेत. पण आता....नाही, हिरोजी हे मला सहन होणं कठीण आहे.

हिरोजी : मला कल्पना आहे सरकार. म्हणून म्हणतो की क़िल्ला बादशहाच्या ताब्यात जाणारच हे समजलंय. मग तो देताना....रिकाम्या तिजोरीसारखा रिकामा द्यावा....

सूर्याजीराव : म्हणजे ?

हिरोजी : बादशहाला तुमच्यावर सूड उगवल्याचं समाधान मिळू देऊ नका. तो तुम्हाला पकडून नेण्याची स्वप्नं पाहात असेल. कारण ज्या घरभेद्यानं तुमच्याबद्दलची माहिती दिली तो बादशहाला मदत करणार हे नक्की. तेव्हा आधी घरभेद्याचा शोध करून त्याचा नीट बंदोबस्त करावा आणि नंतर इथून किल्ला उघडा, उजाड टाकून पसार व्हावं. म्हणजे बादशहाला फक्त एकच समाधान मिळेल. ते म्हणजे केवळ रिकामा किल्ला मिळवण्याचं.

सूर्याजीराव : घरभेद्या....

हिरोजी : या घरभेद्यानंच आपण धुळीला मिळणार सरकार.

सूर्याजीराव : कोण असेल हा घरभेद्या ?

हिरोजी : ते आपणच शोधून काढू शकाल.

सूर्याजीराव : म्हणजे ?

हिरोजी : आपण ही बातमी कोणाजवळ बोलला होता का ?

सूर्याजीराव : मी ! छे .... एका भागोजीशिवाय .... नाहीच दुसऱ्या कोणाजवळही बोललो नव्हतो.

हिरोजी : नीट आठवून पहा सरकार.

सूर्याजीराव : नाही रे. नक्की नाही.

हिरोजी : सहज घरामध्ये ?

सूर्याजीराव : मुळीच नाही. या अशा कोणत्याच गोष्टी मी घरात बोलत नाहीं, मला ठाऊक आहे हिरोजी कीं बायकांच्या तोंडांत थोडासुद्धा तीळ भिजत नाही. त्यामुळे घरामधे मीं अतिशय सावध असतो. तेव्हा तो शंका तू डोक्यामधून काढून टाक.

हिरोजी : दरबारात कोणाजवळ ?

सूर्याजीराव : मुळीच नाही.

हिरोजी : सहज बोलताना एखाद्या हृवालदाराशी ?

सूर्याजीराव : नाही रे मी फक्त....भागोजीशी बोललो.

हिरोजी : मग भागोजी ?

(सूर्याजीराव एकदम तलवार उपसतो.)

सूर्याजीराव : हिरोजी तुझी जबान छाटून टाकीन.

हिरोजी : माफी असावी सरकार. मी आपला तर्क सांगितला.

सूर्याजीराव : एकदा बोललास म्हणून ठीक. पण पुन्हा या उप्पर तू भागोजीबद्दल शंका घेतलीस तर खरोखरच तुझी जबान छाटून टाकीन. सांगून ठेवतो. भागोजी हा माझ्या धाकट्या भावासारखा आहे. मला तो माझ्या सावलीसारखा मदतीला उभा असतो. लढाईच्या वेळी तो माझ्याजवळ असतो तेव्हा मला यमाचीही काळजी वाटत नाही. तेव्हा अशा माझ्या परममित्राबद्दल तू मुळीच शंका घेऊ नकोस.

(याचवेळी भागोजी बाहेरून येतो.)

हा बघ भागोजी आलाच. (भागोजीस) तुला शंभर वर्षं आयुष्य आहे भागोजी.

भागोजी : शंभर वर्षं ! एवढी वर्षं जगून काय करू मी ! किल्लेदारसाहेब आपली सेवा करायची संधी मिळणार असेल तर मात्र शंभर वर्षं जरूर जगेन मी.

सूर्याजीराव : ऐकलंस हिरोजी ?

भागोजी : हिरोजी ?

सूर्याजीराव : हं आपला हेर....

भागोजी : मग काय गुप्त खलबतं चालली होती. (हिरोजीस) काय रे, काही बातमी ?

सूर्याजीराव : फार महत्त्वाची माहिती.

भागोजी : असं, ऐकू दे तरी.

सूर्याजीराव : सांग रे.

हिरोजी : भागोजीराव आपल्या किल्लेदारांचा मनसब विजापूरच्या बादशहाच्या कानावर गेला आहे.

भागोजी : (कोणताही भाव न दाखवता) कसला मनसब ?

हिरोजी : तो आपल्याला माहीत आहे.

सूर्याजीराव : मी त्याला सांगितलं भागोजी–की तुला त्या माझ्या निर्णयाची माहिती आहे म्हणून.

भागोजी : आपण ठरवलेली मसलत कोणाजवळही बोलायची नाही म्हणून मी तसं म्हणालो सरकार.

सूर्याजीराव : पाहिलस हिरोजी.

भागोजी : बरं पण कायरे, खरंच आपल्या किल्लेदारांचा मनसब विजापुरास गेला ?

हिरोजी : हो ना. ती बातमी मला तिथे मिळाली.

भागोजी : कोणाकडून ?

हिरोजी : बादशहाच्या एका सरदाराकडून. त्या सरदाराच्या एका नोकराला मी वश करून घेतलं तेव्हा त्यानं ही बातमी दिली. बातमी फार महत्त्वाची होती. पण म्हणून मी ही बातमी नीट पारखून घेतली. आणि ती नक्की समजल्यावर इकडे पळत आलो.

सूर्याजीराव : पण भागोजी, खरी बातमी पुढेच आहे. सांग हिरोजी.

हिरोजी : बादशहा हा कोंदणगड किल्ला घेण्यासाठी आपलं सैन्य पाठवणार आहे.

भागोजी : (खोटया आवेशानं) शक्य नाही.

हिरोजी : ही माझी बातमी खोटी ठरली तर मी माझी जबान छाटून द्यायला तयार आहे.

भागोजी : जबान छाटून घेण्याची जबान नको. पण माझा या बातमीवर विश्वास बसत नाही. आधी आमच्या मसलती बादशहाच्या कानावर गेल्या कशा ?

सूर्याजीराव : तोच तर मोठा सवाल आहे. तुझा काय तर्क भागोजी.

भागोजी : काहीच तर्क करता येत नाही. कदाचित....

सूर्याजीराव : कदाचित काय ?

भागोजी : काही नाही.

सूर्याजीराव : बोल ना, तुझ्या मनात काय असेल ते सांगून टाक.

भागोजी : उगीच तर्क होता तो.

सूर्याजीराव : तरी सांग ना....

भागोजी : या हिरोजीला बातमी समजली होती ?

हिरोजी : (गडबडून) म्हणजे ! मीच बादशहाकडे बातमी नेली असं आपलं म्हणणं ?

भागोजी : एक तर्क.

हिरोजी : मी पुन्हा सांगतो, मला ही बातमी विजापूरासच मिळाली. भागोजीराव, मी किल्लेदारसाहेबांसाठी हेरगिरीचं काम करतो–विश्वासघाताचं नाही.

सूर्याजीराव : आणि विश्वासघाताची शिक्षा तुला माहीत आहेच.

हिरोजी : अलबत. पण त्या शिक्षेच्या भीतीनं मी कोणतंही काम करीत नाही सरकार. आपली प्रामाणिकपणानं सेवा करावी हा एकच हेतू.

भागोजी : ठीक आहे....तुझा तर्क काय आहे ?

हिरोजी : (चाचरत) काही नाही.

सूर्याजीराव : हिरोजी खोटं बोलू नकोस.

भागोजी : म्हणजे ?

सूर्याजीराव : सांग हिरोजी.

हिरोजी : पण सरकार मी चुकलो.

भागोजी : काय म्हणत होता हा ?

हिरोजी : काही नाही.

सूर्याजीराव : काही नाही म्हणून तू सुटणार नाहीस. सांग (तलवार उपसून) सांग म्हणतो ना.

हिरोजी : माफी असावी भागोजीराव. किल्लेदारसाहेबांनी ती मसलत आपल्याला सांगितली होती म्हणून....

भागोजी : (रागानं) म्हणून काय ?

सूर्याजीराव : म्हणून हा तुझ्यावरच घरभेद्याचा संशय घेत होता.

भागोजी : (संतापानं लाल होत) काय ?

हिरोजी : मी चुकलो.

भागोजी : (तलवार उपसून) मूर्ख माणसा मी तुझी जबानच छाटून टाकतो.

हिरोजी : नको नको. मला क्षमा करा.

भागोजी : नाही तुला क्षमा नाही. शत्रूपेक्षा तुझा गुन्हा मोठा आहे. तुला शिक्षा झालीच पाहीजे. (त्याच्या मानगुटीस धरायला जातो. सूर्याजीराव त्याला अडवतात.)

सूर्याजीराव : नाही भागोजी. मी त्याला क्षमा केलीय. त्याला काहीही करायचं नाही.

भागोजी : आपण म्हणता म्हणून मी याला आत्ता सोडून देतो नाहीतर आताच त्या कडेलोट बुरूजावरून त्याचा कडेलोट केला असता.

सूर्याजीराव : भागोजी, आपल्याला घरभेद्या शोधण्याचं काम तातडीनं हाती घ्यायला हवं.

भागोजी : ते काम आपण माझ्यावर सोपवावं. मी निघालोच. (जातो)

सूर्याजीराव : शाबास. पाहिलंस हिरोजी – याला म्हणतात स्वामिभक्ती.

हिरोजी : सरकार, मला आज्ञा असावी.

सूर्याजीराव : जा. आपलं काम कसोशीनं कर. उगीच वेडे-वाकडे तर्क लढवीत बसू नकोस.

हिरोजी : मी निघतोच. पण निघण्यापूर्वी एक सांगू का?

सूर्याजीराव : सांग ना.

हिरोजी : आपण शिवाजी महाराजांकडे एक पत्र पाठवून त्यांना एखादी मसलत विचारून घ्यावी. महाराज इथे नसले तरी त्यांची माणस त्यांनी या बाबतीत तरबेज करून ठेवली आहेत. तेव्हा. . .

सूर्याजीराव : जरूर. हे मला मान्य आहे.

हिरोजी : मग मी निघतो.

सूर्याजीराव : मलाही निघायला हवं. मीसुद्धा घरभेद्या शोधतो.

( दोघं दोन दिशेला जातात. )

प्रवेश ३ रा

(स्थळ : एक रस्ता. भागोजीरावाच्या येरझारा चालू आहेत. त्याचा शिपाई घाईघाईनं येतो.)

शिपाई : सरकार

भागोजी : काय रे !

शिपाई : किल्लेदारसाहेबांना माझा संशय आलाय.

भागोजी : कशावरून ?

शिपाई : ते मला सारखे उलटसुलट प्रश्न विचारीत होते.

भागोजी : पण काही सांगितलं नाहीस ना !

शिपाई : नाही सरकार.

भागोजी : शाबास. एक शब्द जरी तुझ्या तोंडून गेला तरी तू मरशील हे मी तुला सांगून ठेवतो, मीच तुझा त्या तिथून कडेलोट करीन. . . आणि लक्षात ठेव जर तू कोणत्याही संबंधात माझं नाव घेशील तर मी सरळ तुला खोटं पाडीन. तुझा माझा काही संबंध नाही आणि नव्हता असंच सांगीन. लक्षात ठेव. . . किल्लेदारसाहेब माझं खरं मानतील. तुझं नाही.

शिपाई : होय सरकार.

भागोजी : तेव्हा नीट डोळ्यात तेल घालून लक्ष ठेव. जा.

शिपाई : सरकार. मी एक बातमी ऐकली ती खरी का ?

भागोजी : कोणती बातमी ?

शिपाई : विजापूराहून एक सरदार आपल्या किल्ल्यावर येत आहे. आपला किल्ला ताब्यात घ्यायला. . .

भागोजी : ही बातमी तुला कशी कळली ?

शिपाई : मला समजली. काही शिपाईच बोलत होते खुद्द आपल्या तैनातीतला शिपाई. . .

भागोजी : ठीक आहे. . .तू काही त्याची काळजी करू नकोस.

शिपाई : पण सरकार. माझ्या बढतीचं आणि मेहनतीचं लक्षात असू द्या.

भागोजी : जरूर. आधी माझं काम पुरं होऊ दे. मग तुला बढती. किल्लेदारसाहेब कुठाहेत ?

शिपाई : ते फार बेचैन आहेत सरकार. . .

भागोजी : (हसत) त्यांना बेचैन व्हायलाच पाहिजे. त्या काफीर शिवाजीला-मिळण्याची स्वप्नं पाहायला हवीत नाही का ? मग आता भोगा त्याची फळं. बाकी विजापूरच्या बादशहाची धन्य आहे. नुसती माझी खबर गेल्याबरोबर त्यांनी सरदार पाठवला. त्या सरदाराकडून मानाचं पान नाही मिळवलं तर नावाचा भागोजी नाही मी.

शिपाई : (अजिजीनं) आपण किल्लेदार झालात की मला हवालदाराची जागा मिळावी सरकार.

भागोजी : सांगितलं ना... एकदा मला किल्लेदार होऊ दे. मग बघ. तुला मालामाल करून टाकतो. अरे मालकाच्या ताटात भाकरीचा तुकडा पडला की मग तो बाहेरच्या कुत्र्याला काही फेकू शकतो ... (हसतो. मिशीला पीळ घालतो) जा तू.

(दोघे जातात.)

म. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
(२१) ७८८०२ नों. दि ३/१२/८८
वि नाटक कि. ..................

प्रवेश ४ था

(स्थळ : दरबाराची जागा. एखादी दरबारी खुर्ची असल्यास उत्तम)

सूर्याजीराव : (स्वत:शोच) आता काय होईल त्याला तोंड द्यायला आपण तयार रहायला हवं. हिरोजीच्या म्हणण्याप्रमाणे खरोखर ती बातमी विजापूरास पोचली असली तर इथे संग्राम होणार परमेश्वरा....या कोंदणगडाचे रक्षण करण्याचं सामर्थ्य आता केवळ तुझ्यामध्ये आहे. माझ्या मनाला प्रामाणिकपणे पटल्यामुळेच मी शिवाजी महाराजांना मिळण्याचा निर्णय घेतला होता. पण आता हा माझा आवडता कोंदणगड सोडून जायची वेळ आली तर ........ परमेश्वरा तूच मला ते सामर्थ्य दे. (पडद्यातून ललकारी....... होश्शार विजापूरच्या बादशहाचे एक पाक सरदार खानसाहेब आ रहे हैं– होश्शार .... ..) (भागोजी येतो.)

भागोजी : सरकार, खानसाहेब आले.

सूर्याजीराव : येऊ दे भागोजी, कोणीही येऊ दे. सत्याला भय नसतं. आमची मनोदेवता आम्ही योग्य तेच केलं असं सांगते. आता परमेश्वरच याचा निर्णय देईल.

(खानसाहेब, बरोबर दोन हत्यारबंद शिपाई येतात सगळे मुजरा करतात.)

खानसाहेब : किल्लेदार सूर्याजीराव विजापूरच्या बादशहानं आम्हाला मुद्दाम कोंदणगडावर पाठवलं आहे.

सूर्याजीराव : आम्ही आपलं स्वागत करतो खानसाहेब.

खानसाहेब : हा किल्ला आजुबाजूच्या परिसरातला एक मोठा

भक्कम आणि सुरक्षित असल्यामुळे या किल्ल्यावर खुदावंतांची सारखी नजर असते.

सूर्याजीराव : याबद्दल आम्हाला धन्यता वाटते खानसाहेब.

खानसाहेब : पण आपलं मत काय आहे ?

सूर्याजीराव : कशाबद्दल ?

खानसाहेब : हा किल्ला पातशहाच्या अंमलाखाली रहावा असंच वाटतंय ना आपल्याला ?

सूर्याजीराव : खानसाहेब... .... तो कोणत्या अंमलाखाली राहावा हे ठरविण्यासाठी आम्हाला अवसर मिळायला हवा.

खानसाहेब : (चिडून) कशासाठी ? पातशहाला एवढा वेळ नाही.

सूर्याजीराव : खानसाहेब, पातशहासारख्या मोठ्या माणसांनी मला वेळ नाही हे म्हणणं..... ....

खानसाहेब : खामोश. बकवास बंद करा.

सूर्याजीराव : मला वाटतं खानसाहेब आपण माझ्याशी सल्ला-मसलत करण्यासाठी आला आहात.

खानसाहेब : मुळीच नाही. लुंग्यासुंग्यांशी मसलत करायला आम्हाला फुरसद नसते.

भागोजी : (चिडून) आम्ही लुंगेसुंगे ?

सूर्याजीराव : सबुरीनं भागोजी. खानसाहेब आपले मेहमान आहेत.

खानसाहेब : आम्ही मेहमान नाही.

भागोजी : म्हणजे ?

खानसाहेब : आम्ही पातशहाच्या वतीनं हा कोंढणगड आमच्या ताब्यात घ्यायला आलोत.

सूर्याजीराव : कशासाठी ?

खानसाहेब : इथला विश्वासघातकी कारभार बदलून एक नेक कारभार सुरू करण्यासाठी पातशहांनी आम्हाला पाठवलं आहे.

भागोजी : (तलवारीस हात घालून) खानसाहेब आपल्या बोलण्याचा मतलब लक्षात नाही आला.

खानसाहेब : तुमच्या तो लक्षात येणंही कठीण........

सूर्याजीराव : खानसाहेब आपण या भागोजीचा म्हणजे आमच्या माणसाचा अपमान करीत आहात.

खानसाहेब : छे, छे. उलट त्यांचा सन्मान करण्याची माझी तमन्ना आहे. किल्लेदारसाहेब या किल्ल्याला योग्य किल्लेदार शोधण्यासाठी पातशहानं मला इथे पाठवलंय.

भागोजी : खानसाहेब आपण आमच्या किल्लेदार साहेबांचा अपमान करीत आहात.

खानसाहेब : विश्वासघातकी माणसाचा निराळा मान ठेवण्याची पातशहाला जरुरी नाही.

(भागोजी तलवार उपसतो.)

सूर्याजीराव : हां हां. सबुरीनं.

खानसाहेब : भागोजी, पातशहाच्या लाखो तलवारीपुढे आपली तलवार म्हणजे एक छोटीशी काडी. (हसतो) आप हाथ उठावो उसको कलम किया जायगा....... पातशहाशी टक्कर देणं म्हणजे त्या किल्ल्याच्या भिंतीवर स्वतःचं डोकं आपटून घेण्यासारखं आहे........ सूर्याजीराव, आता मला गम नाही. तुम्ही मुकाट्यानं माझ्या स्वाधीन व्हा. किल्लेदारीची वस्त्र खाली ठेवा.

भागोजी : नाही सरकार. हे मान्य करू नका.

खानसाहेब : मग किल्ल्याच्या खाली उभ्या असलेल्या हजारो सैन्याला मी इशारा देऊ.... आता या कोंदणगडाची राखरांगोळी होईल. सारं काही जळून जाईल तेव्हा मुकाट्यानं माझं ऐका.

सूर्याजीराव : पण माझा गुन्हा तरी कोणता ?

खानसाहेब : विश्वासघात.

सूर्याजीराव : कोणाचा विश्वासघात केला मी ?

खानसाहेब : खुद्द पातशहाचा.

सूर्याजीराव : कसला ?

खानसाहेब : वा ! काय रुबाब ! जसं काही तुम्हाला माहीतच नाही. सूर्याजीराव हा कोंदणगड तुम्ही त्या काफर शिवाजीच्या ताब्यात देणार होता...... ही बातमी विजापूरच्या दरबारात गेली आणि तिथूनच मी आलो.

भागोजी : खोटं आहे हे.

खानसाहेब : ते किल्लेदारसाहेबांनी सांगू दे. बोला.

सूर्याजीराव : मला विचारू नका.

खानसाहेब : तुम्हाला विचारायचं नाही तर दुसऱ्या कोणाला ? सूर्याजीराव, तुमच्या परमेश्वराची शपथ घेऊन सांगा की, हा किल्ला शिवाजीच्या ताब्यात द्यायची इच्छा तुमच्या मनात झाली नव्हती ! बोला........

भागोजी : नाही म्हणून सांगा सरकार.

खानसाहेब : तू थांब भागोजी. बोला सूर्याजीराव.

भागोजीराव : नाही.

खानसाहेब : (रागानं) खामोश.

सूर्याजीराव : खरं आहे हे.

खानसाहेब : विश्वासघातकी ! पातशहाशी ही नमकहरामी करतो काय !

सूर्याजीराव : पातशहाचं मीठ खात नाही मी.

खानसाहेब : मग आता तेच खावं लागेल ...टाक ती तलवार. (शिपायांना) गिरफतार करो. (पकडतात.) खैर–एक काम तर झालंच. पण दुसरे काम....याच ठिकाणी एक मोठा चालाख–मोठा हरहुन्नर–मोठा होशार माणूस आहे की ज्यानें हा सूर्याजी शिवाजीच्या ताब्यात किल्ला देणार–ही बातमी विजापूरला पोचवली. कोण आहे तो. भागोजी त्या माणसाला शोधून आणा. दवंडी द्या. काहीही करा. पण त्याला माझ्यासमोर आणा. पातशहाच्या वतीने त्याला मालामाल करायचा आहे. या किल्ल्याची किल्लेदारी त्याच्या हाती द्यायची आहे.

भागोजी : खरंच खानसाहेब !

खानसाहेब : खरंच म्हणजे ! तुला पातशहाबद्दल शक येतोय ?

भागोजी : तसं नाही पण....

खानसाहेब : बकवास बंद कर. आधी त्या माणसाला शोधून आण....

भागोजी : किल्लेदारसाहेबास इथून घेऊन जा. नंतर....

खानसाहेब : नंतर नाही.... ( सूर्याजीकडे बोट दाखवून ) याच्या देखतच मला हे काम करायचंय काय सूर्याजी.. सगळी माणसं तुझ्यासारखी विश्वासघातकी नसतात. या ठिकाणी पातशहावर प्रेम करणारी माणसं आहेत. (भागोजीची चुळबूळ

सुरू आहे)....आणि जोपर्यंत अशी माणसं या जगात आहेत तोपर्यंत पातशहाच्या सलतनतीला काळजी नाही. (भागोजीस) कायरे भागोजी तू उभा का ? त्या माणसाला शोधून आण.

भागोजी : खानसाहेब...जरा इकडे येता का ? तुमच्या कानात सांगतो !

खानसाहेब : मूर्खा—मैं क्या औरत हूँ ! कानात कसली कुजबूज करतो. काय बोलायचंय ते मोठ्याने सांग.

भागोजी : (धीर धरून) खानसाहेब विजापूरच्या पातशहाला ती बातमी मी दिली.... (सूर्याजी सर्द होतो)

सूर्याजीराव : भागोजी तू !

खानसाहेब : पुन्हा सांग.

भागोजी : (सांगतो)

खानसाहेब : पुन्हा सांग

भागोजी : (सांगतो) खरंच मी दिली.

(सूर्याजी संतापानं लाल झालाय. त्याचे ओठ थरथरताहेत) माझ्या एका शिपायाच्या मार्फत मी ही खबर पोचवली. खानसाहेब मी तुम्हाला तो शिपाईसुद्धा दाखवतो. (टाळी वाजवतो. त्याचा शिपाई येतो). हा पहा. खानसाहेब, आता मला मालामाल करा....मला किल्लेदार करा.

शिपाई : आणि मला हवालदार !

खानसाहेब : वाह्व्वा.. वाह्व्वा. बहोत खूब ! काय नेक माणसं आहात तुम्ही. पातशहाला मदत क.....

भागोजी : जरूर. आपण सांगा

IRBK-0116873

IRBK-0116873

खानसाहेब : पण या सूर्याजीला जसा तू दगाफटका दिलास तसा तर तू पातशहाला देणार नाहीस !

भागोजी : मुळीच नाही. अल्लाची कसम.

खानसाहेब : मग या सूर्याजीला का फसवलंस तू ! काय सूर्याजी ?

सूर्याजीराव : खानसाहेब मला काही विचारू नका. हिरोजीच्या सल्ल्यापेक्षा या घरभेद्यावर मी विश्वास ठेवला त्याचे प्रायश्चित्त मला मिळतंय. तुम्ही द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे, पण याच्या बाबतीत मला काही विचारू नका. मी काही सांगणार नाही.

भागोजी : जल्दी करा खानसाहेब. मला किल्लेदार करा.

खानसाहेब : हां हां जरूर ...त्यासाठी तर आलोय मी. आणखी कोण कोण माणसं आहेत तुझी ?

भागोजी : आम्ही दोघेच आहोत

खानसाहेब : शाबास....तुमच्या तलवारी द्या इकडे.

भागोजी : कशासाठी ?

खानसाहेब : तुला किल्लेदार व्हायचंय ना ! मग मी सांगतो ते ऐक. ( दोघांनी तलवारी दिल्या ) छान आता गुडघे टेकून दोघं खाली बसा. मान खाली करा....(सोबतच्या शिपायांना नजरेनं इशारा देतो. ते दोघांना पकडतात)

भागोजी : हे काय खानसाहेब ! आम्हाला कैद ?

(खानसाहेब दाढी व टोप काढतो.)

सूर्याजी : कोण हिरोजी ! तू ?

भागोजी : कोण ! हिरोजी !

हिरोजी : होय सरकार. घरभेद्या दाखवून देण्यासाठी मला ही युक्ती शोधावी लागली. सरकार आपला या दुष्ट भागोजीवर एवढा विश्वास होता म्हणूनच मी आपल्याला खरी बातमी नीट सांगू शकलो नव्हतो. नाहीतर ती खबर यानेच पातशहाला दिली हेही मला समजलं होतं.

(सूर्याजीच्या डोळयातून अश्रुधारा वाहतात)

सूर्याजीराव : हिरोजी, हिरोजी आज तू माझ्या डोळयात अंजन घातलंस (मिठी मारतो) (पहारेकऱ्यास) घेऊन जा या दोघा घरभेद्यांना आणि करा यांचा कडेलोट. जा (घेऊन जातात).

हिरोजी : सरकार ताबडतोब किल्ला खाली करून चला. (दूर दाखवत) ती पहा पातशहाच्या सैन्याची धूळ उडताना दिसते आहे.

सूर्याजीराव : चल....परमेश्वरानंच न्याय दिलाय. माझ्या अंधश्रद्धेची मला शिक्षा मिळाली. वाईट वाटतं की त्यासाठी मला हा माझ्या आवडता किल्ला सोडावा लागतोय...हे दुर्गराज तुला माझे शतशः प्रणाम.

□ □ □

ने. म ठाणे, धान्यमालय शाखा.
वा. क. ७६८८३ नों. दि. ३१.३.१०.४२
वि. ना. ना ..........